# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६ ००४.

क्र.कोविमं/लेखा/नो.शु/ 5783
दिनांक :०७/१२/२०२०

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य,
मान्यताप्राप्त सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्याये,
सातारा/सांगली/कोल्हापूर

**विषय :- नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण वर्गणी जमा करणेबाबत.**

संदर्भ :- १) या कार्यालयाचे क्रमांक कोविमं/लेखा/नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण वर्गणी/४१९६, दि. २८/७/२०२०

२) या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक कोविम/शिक्षण संक्रमण/२०२०/४६०९, दिनांक २४/८/२०२०

३) या कार्यालयाचे पत्र क्रमांक कोविमं/लेखा/नो.शु./५२३८, दिनांक १३/१०/२०२०

४) राज्यमंडळ, पुणे यांचे पत्र क्र.रा.मं./लेखा-६/अंदाजपत्रक/नो.शु./४८९१, दिनांक २४/११/२०२०

उपरोक्त विषयास अनुसरून **सन २०२०-२१** ची चे नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क भरणेबाबत संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात आले होते. तथापि विभागीय मंडळ कार्यक्षेत्रातील सातारा, सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यातील ज्या माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयानी अद्याप विद्यार्थी संख्येनुसार नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण वर्गणी रुपये ५००/- (दोन अंक २५०+२५०) मंडळाकडे जमा केलेली नाही. अशा माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयानी नोंदणी शुल्क दंडासहित (दिनांक ०१/१०/२०२० पासून रू.५००/- दंड) व शिक्षण संक्रमण वर्गणी रू.५००/- मंडळाकडे त्वरीत दिनांक १५/१२/२०२० पर्यंत जमा करावे. चलनावर सन २०२० असा उल्लेख करावा. तसेच यापुर्वीच जमा केले असेल तर सदर जमा केलेल्या चलनाची प्रत मंडळ कार्यालयाकडे त्वरीत पाठविण्यात यावी.

तसेच ज्या माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी **सन २०१९-२०** या शैक्षणिक वर्षातील नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क मंडळाकडे जमा केले नाही अशा माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी सदर शुल्क त्वरीत दंडासह मंडळाकडे चलनाने जमा करावे व चलनावर सन २०१९-२० असा उल्लेख करावा. यापुर्वीच जमा केले असेल तर सदर जमा केलेल्या चलनाची प्रत मंडळ कार्यालयाकडे त्वरीत पाठविण्यात यावी.

ज्या माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी सन २०१९-२० व सन २०२०-२१ चे नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क जमा केले नाही तर अशा शाळा व कनिष्ठ महाविद्यलयातील विद्यार्थ्यांची मार्च २०२१ परीक्षेसाठी ऑनलाईन आवेदनपत्रे सादर करण्यासाठी Online Access & User ID, Password देण्यात येणार नाहीत याची नोंद घेण्यात यावी.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

प्रत माहितीस्तव: मा.सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, राज्यमंडळ, पुणे